# ८. सहकारी विपणन संस्था (सहकारी खरेदी-विक्री संस्था)

(Marketing Co-operative Society)


| | | | |
|---|---|---|---|
| ८.१ | प्रस्तावना | ८.५ | संघटन रचना |
| ८.२ | अर्थ आणि व्याख्या | ८.६ | सारांश |
| ८.३ | वैशिष्ट्ये | ८.७ | महत्त्वाच्या संज्ञा |
| ८.४ | कार्ये | ८.८ | स्वाध्याय |




सहकारी विपणन संस्था

## ८.१ प्रस्तावना:- (Introduction)

भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हटले जाते. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळवून देण्यासाठी व मध्यस्थापासून मुक्तता करण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संस्था स्थापन झालेल्या आहेत. शेतकऱ्यांकडील शेतमाल खरेदी करून तो ग्राहक व व्यापाऱ्यांना विक्री करण्याची व्यवस्था ही संस्था करीत असते. या संस्था खरेदी विक्री संस्था अथवा विपणन संस्था या नावानेही ओळखल्या जातात.

शेतीमालाच्या विक्री व्यवस्थेत अनेक दोष दिसून येतात. शेतीमालाची विक्री दलालामार्फत केल्याने शेतकऱ्यांची वजनमापात फसवणूक केली जाते. शेतमालाला कमी किंमत देऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते. यामुळे शेती उत्पादनात वाढ व सुधारणा करण्यास त्यांना वाव राहत नाही.शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य, अशिक्षितपणा, बाजारपेठेचे अपुरे ज्ञान, साठवणूकीचा अभाव, सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतीमालास पुरेसा भाव न मिळणे या सारख्या कारणांमुळे जी किंमत मिळेल त्याच किंमतीला शेतकरी शेतमालाची विक्री करतो.

शेतमालास योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी शेतमाल खरेदी – विक्री संबंधी आवश्यक कार्य सहकारी तत्त्वावर पार पाडण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थांना "विपणन सहकारी संस्था" अथवा "सहकारी खरेदी – विक्री संस्था" असे म्हणतात.

शेती क्षेत्राच्या विकासात सहकारी विपणन संस्थांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या प्रकरणात आपण सहकारी विपणन संस्थेचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

### सहकारी विपणन संस्थेची स्थापना :

उत्पादक ते ग्राहकापर्यंत माल विक्रीस प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांच्या शेतीमाल विक्री तसेच निर्यातक्षम उत्पादनाविषयी साहाय्य करण्यासाठी सहकारी विपणन संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. भारतातील पहिली सहकारी विपणन संस्था मुंबई प्रांतातील हुबळी येथे १९१५ मध्ये स्थापन झाली. सध्या महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर १२०७ सहकारी विपणन संस्था आहेत.

## ८.२ अर्थ आणि व्याख्या:– (Meaning & Definition) :

### अर्थ:

'विपणन' ही संज्ञा अतिशय व्यापक अर्थाने वापरली जाते. विपणनामध्ये वस्तूची खरेदी व विक्री आणि विविध व्यावसायिक सेवा इ. चा समावेश होतो. या संस्था उत्पादकांकडून शेतमालाची खरेदी करतात व ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक ती कार्ये पार पाडतात.

सहकारी विपणन संस्था ही शेतकऱ्यांनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली असते. सभासद शेतकऱ्यांचा माल किफायतशीरपणे विकून देणारी ही संघटना असते. या संस्था सभासद शेतकऱ्यांच्या शेतमालाचे एकत्रीकरण, वाहतूक व साठवणूक करणे, शेतमालाचे प्रमाणीकरण करून त्याची प्रतवारी ठरविणे, शेतीमालाला चांगली बाजारपेठ मिळवून देणे इ. कार्ये करतात. या संस्थांमार्फत शेती उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने उच्च प्रतीची बी-बियाणे, खते, कीटकनाशके व अवजारे पुरविणे यासारख्या सेवा पुरवून शेतकऱ्यांची बाजारात होणारी पिळवणूक थांबविली जाते. शेती क्षेत्राशिवाय विणकर, मच्छिमार, दोरखंड उत्पादन अशा अन्य क्षेत्रातही सहकारी खरेदी – विक्री संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात. आदर्श व्यापारी प्रथा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून या संस्थांची भूमिका खूप महत्त्वाची असते.

### व्याख्या :

सहकारी विपणन संस्थेच्या व्याख्या अनेक विचारवंत व तज्ज्ञांनी केलेल्या आहेत. त्या सर्वांच्या व्याख्यांमध्ये शेतमालाच्या खरेदी विक्री कार्यावर भर दिला आहे. काळानुरूप सहकारी विपणन संस्थांची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. विपणन सहकारी संस्थांच्या विविध व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.


१) **भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या व्याख्येनुसार :** "खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा अधिक किफायतशीरपणे शेतमालाची खरेदी – विक्री करण्याच्या कार्यात सभासदांना मदत करावी या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी – विक्री संस्था होय."

२) **मार्गारेट डिग्बी–अन्न अणि शेती संघटनेच्या तज्ज्ञ यांच्या मतानुसार :** "उत्पादक ते उपभोक्त्यापर्यंत आवश्यक असणाऱ्या शेतमालाची विपणन क्रिया सहकारी तत्त्वावर करणारी संस्था म्हणजे सहकारी खरेदी – विक्री संस्था होय."

३) **डॉ.बी.एस.माथुर यांच्या मते :** "विपणन सहकारी संस्था ही शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वावर विपणन कार्ये करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय."

वरील व्याख्या विचारात घेतल्यास असे लक्षात येते की, सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांनी स्वेच्छेने स्थापन केलेली व सभासद शेतकऱ्यांचा शेतमाल रास्त किमंतीत विकून देणारी संघटना असते. उत्पादकांपासून थेट ग्राहकांपर्यंत सर्व क्रिया करून शेतकऱ्यांचे हितसंबंध जपते.

## ८.३ सहकारी खरेदी – विक्री/विपणन संस्थेची वैशिष्ट्ये : (Characteristics of Marketing Co-operative Society):




सहकारी विपणन संस्था या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन त्यांच्या आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या असतात. या संस्थांची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) **शेतकऱ्यांचे ऐच्छिक संघटन :** सहकारी खरेदी विक्री संस्था शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था होय. संस्था ज्या भागासाठी स्थापन झालेली आहे तेथील सज्ञान शेतकऱ्यांना संस्थेचे सभासद होता येते. कोणत्याही व्यक्तिवर सभासद होण्यासाठी सक्ती केली जात नाही. सभासदत्व रद्द करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणला जात नाही. आपल्या इच्छेनुसार सभासदत्व रद्द केले जाऊ शकते.

२) **शेतमालाचे विपणन –** सहकारी खरेदी विक्री संस्था या शेतकरी सभासदांकडून विपणनासाठी शेतमाल प्राप्त करतात. मालाचे एकत्रीकरण, वर्गीकरण, साठवणूक करणे व मालास योग्य किंमत मिळवून देणे, शेतमालाची विक्री करणे तसेच रास्त दरात शेती उपयोगी व जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे यासारखी कामे करतात. जेणेकरून अनिष्ट व्यापारी प्रथांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याबाबत काळजी घेतली जाते.

३) **विस्तृत कार्यक्षेत्र :** सहकारी विपणन संस्थांचे कार्यक्षेत्र खूपच विस्तृत असते, सभासद अनेक भागातून एकत्र आलेले असतात. प्राथमिक विपणन संस्थांचे कार्य मर्यादित असते. जिल्हा विपणन संस्थांचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यापुरते मर्यादित असते. आणि राज्य विपणन संघाचे विशिष्ट राज्यापुरते मर्यादित असते व राष्ट्रीय विपणन महासंघाचे कार्य संपूर्ण देशभर चालते.

४) **भांडवल उभारणी :** सहकारी विपणन संस्था आपल्या सभासदांना भाग विकून भांडवलाची उभारणी करीत असतात. याशिवाय संस्थांना लागणारे भांडवल वेगवेगळ्या वित्तीय संस्थांकडून कर्जरूपात मिळविले जाते.

५) **लोकशाही कारभार :** विपणन सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. या संस्थांच्या दैनंदिन कामकाजासाठी संचालक मंडळ किंवा कार्यकारी समिती असते. संचालक मंडळ हे सभासदांमधून निवडले जाते. संस्थेचे महत्वाचे निर्णय सभासदांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतले जातात.

६) **पतपुरवठा व विक्रीत सांगड :** सहकारी विपणन संस्थांमुळे पतपुरवठा आणि शेतीमाल विक्री यात सांगड घालता येते. शेतकरी पतपुरवठा संस्थेकडून कर्ज घेतात. हंगामानंतर शेतमाल विकल्यावर पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांकडून येणे असलेल्या रकमा वसूल करून घेतात व उरलेली रक्कम शेतकऱ्यास परत करतात. अशाप्रकारे पतपुरवठा संस्थांच्या थकबाकीचे प्रमाण कमी होते. तसेच वसुलीचे प्रमाण वाढल्याने अन्य सभासदांच्या आर्थिक गरजा भागविता येतात.

७) **शासनास धान्य खरेदी कार्यात मदत :** देशातील जनतेला अन्नधान्य व अन्य वस्तूंचा आवश्यक तितका पुरवठा व्हावा म्हणून केंद्र सरकार देशाच्या विविध बाजारपेठांमधून धान्य खरेदी करीत असते. विविध राज्यातील विपणन संस्था सरकारला या कामात मदत करतात, सहकारी विपणन संस्थांचे ग्रामीण भागापर्यंत पसरलेले जाळे आणि शेतकरी वर्गाशी असणाऱ्या संबंधामुळे सरकार धान्य खरेदी करू शकते.

८) **संघीय रचना :** भारतात सहकारी विपणन संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे. प्राथमिक/ गाव किंवा तालुका पातळीवर प्राथमिक सहकारी विपणन संस्था स्थापन केली जाते. जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी विपणन संस्था, राज्य पातळीवर राज्य सहकारी विपणन संस्था व राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सहकारी विपणन संघ (नाफेड) कार्यरत आहे. अशाप्रकारे सहकारी विपणन संस्थांची रचना ही संघीय स्वरूपाची आहे.

९) **सभासदांच्या क्रयशक्तीत वाढ :** सहकारी विपणन संस्था आपल्या सभासदांच्या क्रयशक्तीत वाढ करण्यासाठी मदत करीत असतात. उदा. सभासदांच्या शेतमालास योग्य भाव मिळवून देणे, उत्पादनात वाढ करणे, शेतमालाच्या तारणावर आगाऊ रक्कम उचल देणे, सभासदांची खरेदीशक्ती व सौदाशक्ती वाढविणे. सभासदांच्या सौदाशक्तीत वाढ झाल्याने त्यांना आर्थिक अडचणीच्या प्रसंगी आपला माल कमी किंमतीत मध्यस्थांना विकण्याची वेळ येत नाही.

१०) **बाजारपेठेविषयी माहिती व अन्य सुविधा :** शेतकऱ्यांना बाजारपेठांविषयी माहिती देणे, उत्पादन वाढीच्या योजना आखणे, बी-बियाणे, खते, कीटकनाशके पुरविणे, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे इ. सुविधा संस्थेमार्फत पुरविल्या जातात.

११) **मध्यस्थांचे उच्चाटन :** विपणन सहकारी संस्था शेतीमालाचे विपणन स्वत:च करीत असल्याने शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या मध्यस्थांकडून शेतकऱ्यांची सुटका होते. शेतमाल खरेदी विक्रीमध्ये मुख्यत: वजनमापे, हिशेब, बाजारभाव इ. बाबत फसवणूक होते. मध्यस्थांचे उच्चाटन झाल्याने उचित व्यापारी पद्धतीमुळे शेतकऱ्यांना ग्राहकांकडून योग्य किंमत मिळते व त्याचा आर्थिक फायदा विपणन संस्थेला होतो.




**कृती–**

**१) ''सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत'' चर्चा करा.**

### ८.४ सहकारी विपणन संस्थांची कार्ये :– (Functions of Marketing Co-operative Soeiety)

सहकारी खरेदी विक्री संस्थांची कार्ये शेतमालाच्या खरेदी विक्री संबधित आहेत. त्यामुळे शेतमालाच्या खरेदी विक्री पर्यंतच्या सर्व बाबींचा समावेश या संस्थाच्या कार्यांत होतो. सहकारी विपणन संस्थांची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.




१) **शेतमालाचे एकत्रीकरण व प्रतवारी करणे :** विपणन सहकारी संस्थेकडून शेतमालाचे एकत्रीकरण केले जाते. कारण प्राथमिक सहकारी विपणन संस्थेचे कार्यालय मुख्यत: तालुक्याच्या ठिकाणी असते. त्यांचे सभासद शेतकरी ग्रामीण भागात विखुरलेले असतात. सर्व शेतकऱ्यांचा शेतमाल सारख्या प्रतीचा, दर्जाचा, गुणधर्माचा अणि वजनाचा नसतो. म्हणून शेतमालाचे एकत्रीकरण करून त्या मालाची प्रतवारी केल्यास चांगली किंमत प्राप्त होते.

२) **साठवणुकीच्या सोयी :** शेतमालाच्या साठवणुकीच्या सोयी शेतकऱ्यांकडे उपलब्ध असल्यास शेतमालाची नासधूस होत नाही.योग्य किंमत मिळेपर्यंत शेतमाल साठवणूक करण्यासाठी विपणन सहकारी संस्था शेतकऱ्यांना सोयी पुरवितात. बऱ्याच शेतकऱ्यांकडे साठवणुकीची सुविधा नसते. साठवणुकीची योग्य व्यवस्था असल्यास मालाची गुणवत्ता टिकून राहते. ही सेवा शेतकऱ्यांना अल्प दरात पुरविली जाते.

३) **मालाची बांधणी करणे :** शेतमालाची बाजारपेठेपर्यंत किंवा गोदामात वाहतूक करण्यासाठी नीट हाताळणी करता यावी व माल साठविणे सोपे जावे यासाठी मालाच्या स्वरूपाप्रमाणे त्याची बांधणी केली जाते. मालाची बांधणी केल्यामुळे वस्तूतील गुणधर्म टिकून राहतात. बांधणी व्यवस्थित असल्यास माल कमी जागेत साठविता येतो व कमी खर्चात मालाची वाहतूक करता येते.

४) **मालाची वाहतूक करणे :** शेतमालाची वाहतूक वेळोवेळी करावी लागते. शेतकऱ्यांकडील शेतमाल गोदामात आणणे, वर्गीकरण केलेला माल गोदामात नेणे आणि मागणीनुसार मालाची वाहतूक करून त्याचा पुरवठा केला तरच शेती मालाला चांगली किंमत मिळते.

५) **शेतमालाची विक्री करणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्थेचे प्रमुख कार्य म्हणजे शेतमालाची विक्री करणे हे होय. या संस्था सभासद शेतकऱ्यांचा शेतमाल वाजवी दराने विकतात. सहकारी संस्था अभावी शेतकऱ्यांचा शेतमाल विकतांना त्यांची फसवणूक केली जाते. खोटी वजनमापे, कमी किंमत, मध्यस्थ इ. मुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी पिळवणूक होते. काही संस्था मालाची विक्री ग्राहक भांडारे स्थापन करून करतात.

६) **शेतमालाच्या तारणावर उचल देणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्थांना आपल्या शेतमालाची विक्री तत्काळ करणे शक्य नसते. शेतकऱ्यास आर्थिक गरज भासल्यास सहकारी खरेदी विक्री संस्था ह्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत शेतमालाच्या तारणावर किमान ६०% ते ७०% पर्यंत रक्कम उचल देतात. या उचलीमुळे शेतकऱ्यांची अर्थिक गरज पूर्ण होते.अशा वेळेस शेतमालास योग्य किंमत मिळेपर्यंत शेतकरी वाट पाहू शकतात.

७) **सरकारच्या वतीने शेतमालाची खरेदी :** शेतमालाची किमान आधारभूत किंमत शासन ठरविते, जेव्हा बाजारपेठेतील किंमत आधारभूत किंमतीपेक्षा कमी होते तेंव्हा सरकार सभासद शेतकऱ्यांकडून माल खरेदी करते. अशी खरेदी सरकारच्या वतीने सहकारी खरेदी-विक्री संस्था करीत असतात. उदा. महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस खरेदी, नाफेड मार्फत कांदा खरेदी यासाठी तालुका स्तरावरील प्राथमिक सहकारी खरेदी विक्री संस्था मदत करीत असतात.

८) **सभासदांना आवश्यक माहिती पुरविणे :** सहकारी विपणन संस्थेकडून सभासदांना आवश्यक माहिती दिली जाते. नवनवीन उत्पादन तंत्राविषयी माहिती पुरविणे. बाजार-पेठांविषयी माहिती देणे व मार्गदर्शन करणे, मालाच्या किमंती, आवक, नवीन बदल, बाजारपेठांतील घडामोडी, मालाची मागणी, पुरवठा, निर्यात इ. संदर्भात या संस्था सभासद शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देतात.

९) **किंमतीवर नियत्रंण ठेवणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, साठवणूक, प्रक्रिया इ. कार्य करतात. त्यामुळे मध्यस्थ वर्गास वाव मिळत नाही. ग्राहकांच्या मागणी प्रमाणे वाजवी किमंतीत मालाचा पुरवठा केला जातो. त्यामुळे मालाच्या किमंतीत चढउतार होत नाही व बाजारपेठांतील किमंतीवर आपोआपच नियत्रंण राहते.

१०) **शेतमालाची निर्यात करणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाच्या निर्यातीचे कार्य करतात. सभासद शेतकऱ्यांनी निर्यातक्षम योग्य शेतमालाचे उत्पादन केल्यास त्यासाठी मालाची बांधणी करणे, मुद्रीकरण, चिन्हांकन, बिले तयार करणे इ. सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. प्राथमिक सहकारी विपणन संस्था, राज्य सहकारी विपणन संघ ह्या संस्था राष्ट्रीय सहकारी विपणन संघ (नाफेड) यांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर खरेदी-विक्री करण्याचे कार्य करतात.




**कृती-**

**२) तुमच्या परिसरातील खरेदी विक्री सहकारी संस्थांची माहिती संकलित करा.**

## ८.५ सहकारी खरेदी विक्री संस्थांची संघटन रचना : (Organisational Structure of Marketing Co-operative Societies) :

सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना पिरॅमिड प्रमाणे असून महाराष्ट्रामध्ये ती पुढीलप्रमाणे असते.



१) **प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था : (Primary Co-operative Marketing Societies) :** या संस्था तालुका किंवा ग्रामीण/गाव पातळीवर स्थापन झालेल्या असतात. या संस्था शेतमालाचे एकत्रीकरण करणे, प्रतवारी लावणे, मालाची साठवणूक, वाहतूक करणे, शेतमालाची विक्री करणे, सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके पुरविणे, शेतमालाच्या तारणावर कर्ज देणे इ. कार्य करतात. या संस्थांचे कार्यक्षेत्र तालुक्यापुरते किंवा २ते ४ बाजारपेठांपुरते मर्यादित असते. त्या परिसरातील कारागीर, शेतकरी, कुटीरोद्योग करणारे या संस्थांचे सभासद असतात.

२) **जिल्हा सहकारी मध्यवर्ती खरेदी-विक्री संघ : (District Central Co-operative Marketing Federation) :** प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांद्‌वारे जिल्हा सहकारी विपणन संस्थांची स्थापना केली जाते. या संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा असते. त्या जिल्ह्यातील सर्व प्राथमिक खरेदी विक्री संस्था या संघाच्या सभासद असतात. प्राथमिक संघाच्या कार्यात सुसूत्रता व समन्वय घडवून आणणे. प्राथमिक संघाच्या खरेदी विक्री व माल साठवणूक या कार्यात मार्गदर्शन करणे तसेच शेतीमालाची खरेदी-विक्री व उपभोग्य वस्तूंचे वाटप या संस्थेद्‌वारे केले जाते.

३) **राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ : (State Co-operative Marketing Federation :** राज्य पातळीवरील ही सर्वोच्च विपणन संस्था होय. राज्यातील जिल्हा सहकारी विपणन संघ एकत्र येऊन या संस्थेची स्थापना करतात. निर्यात व्यापाराबरोबर सरकारच्या वतीने धान्य वसुली कार्यासही हातभार लावते. राज्यातील खरेदी विक्री संघाच्या कार्यात एकसूत्रता आणणे. सरकारला व सहकारी संस्थांना शेतमालाच्या खरेदी विक्रीबाबत मार्गदर्शन करणे. जिल्हा व प्राथमिक सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करण्याचे कार्य राज्य खरेदी विक्री संघ करतो. राज्यातील सर्व जिल्हा खरेदी विक्री संघ याचे सभासद असतात.

४) **राष्ट्रीय सहकारी खरेदी विक्री संघ/ नाफेड : (National Agricultural Marketing Federation) :** देशातील विविध राज्यातील राज्य खरेदी-विक्री किंवा राज्य सहकारी विपणन संस्थांनी राष्ट्रीय पातळीवर एकत्र येऊन स्थापन केलेला हा संघ असतो. यास 'नाफेड' असेही म्हणतात. या संघाची स्थापना २ ऑक्टोबर, १९५८ रोजी झाली. नाफेडचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे. ही संस्था आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेते. राज्य सहकारी खरेदी विक्री संस्थांचा संघ म्हणून नाफेड कार्य करते. राज्य स्तरावरील संस्थांच्या कार्यात समन्वय व सुसूत्रता निर्माण करणे. व आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय व्यापारात मदत करण्याचे कार्य नाफेड करते. ज्या राज्यात एखाद्या विशिष्ट शेतमालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले आहे. अशा राज्यातून शेतमालाची खरेदी नाफेड करत असते. तसेच शेतमालाच्या किंमत स्थिरीकरणाचे काम ही संस्था करते. अंतर्गत व्यापाराबरोबर शेतमालाची निर्यात नाफेड मार्फत केली जाते. सध्या नाफेड विपणन संशोधन व विपणनाची माहिती गोळा करते. या संघाने बाजार संशोधन व समाचार प्रसारण विभाग व कृषी आदान विभाग स्थापन केला आहे. आधारभूत किंमत योजनेची अंमलबजावणी नाफेड मार्फत केली जाते.

थोडक्यात, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, शेतकऱ्याला प्रतिष्ठा मिळवून देणे, शेतीचा विकास साधण्यासाठी ग्रामीण विकासाला चालना देणे. यासाठी सहकारी विपणन संस्थांचे महत्त्व आहे.




नाफेड

**फरक – प्रक्रिया सहकारी संस्था व सहकारी विपणन संस्था**

| अ.नं | मुद्दे | प्रक्रिया सहकारी संस्था | सहकारी विपणन संस्था |
|---|---|---|---|
| १ | **अर्थ** | शेतमालावर प्रक्रिया करून तो शेतमाल ग्राहकांसाठी उपभोग योग्य बनवून अंतिम वस्तू म्हणून बाजारात विक्री करणाऱ्या संस्था म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय. | शेतमालास योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण व्हावे या हेतूने शेतमालाच्या खरेदी–विक्री संबधी आवश्यक कार्ये सहकारी तत्त्वावर पार पाडण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या संस्थांना विपणन सहकारी संस्था असे म्हणतात . |
| २) | कार्य | कापूस, ऊस, तेलबिया, फळे यासारख्या शेतमालावर प्रक्रिया करणे, प्रक्रिया केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे, तसेच मुख्य उत्पादनाबरोबर उप वस्तूंचे उत्पादन करणे. | शेतमालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रमाणीकरण, बांधणी, वाहतूक व्यवस्था करणे, शेतमालाची खरेदी विक्री करणे, शेतमालाला योग्य किंमत मिळवून देणे. |
| ३) | उद्देश | प्रक्रिया सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश मालावर प्रक्रिया करणे हा असतो. | विपणन सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश शेतमालाची खरेदी विक्री करून योग्य किंमत मिळवून देणे हा असतो. |
| ४) | सभासदत्व | शेतमालाचे उत्पादक शेतकरी सभासद असतात. | शेतमालाची विक्री करणाऱ्या व्यक्ति सभासद असतात. |
| ५) | कार्यक्षेत्र | प्रक्रिया सहकारी संस्था या प्रामुख्याने ग्रामीण भागात कार्य करताना आढळून येतात. | या संस्था ग्रामीण व नागरी भागात कार्य करतात. |
| ६) | मदत | उपउत्पादनाच्या विकासास चालना देण्यासाठी शेतीपूरक व्यवसायाच्या विकासास मदत करतात. | दर्जेदार शेतमालाच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देतात व मार्गदर्शन करतात. |

## ८.६ सारांश

भारताची अर्थव्यवस्था आजही बहुतांश शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळण्यासाठी, मध्यस्थांपासून सुटका होण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संस्थांची आवश्यकता असते. या संस्थांना विपणन संस्था असेही म्हणतात. शेतमालाची खरेदी-विक्री करणे हे संस्थेचे प्रमुख कार्य असते. शेतीक्षेत्राचा विकास व ग्रामीण विकास या दृष्टीने संस्था खूप उपयुक्त असतात.

**व्याख्या :** ''विपणन सहकारी संस्था म्हणजे शेतकऱ्यांनी शेतमालाची सहकारी तत्वावर खरेदी-विक्रीचे कार्य करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय.''

❑ **वैशिष्ट्ये :**

१. शेतकऱ्यांचे ऐच्छिक संघटन
२. शेतमालाचे विपणन
३. विस्तृत कार्यक्षेत्र
४. भांडवल उभारणी
५. लोकशाही कारभार
६. पतपुरवठा व विक्रीत सांगड
७. शासनास धान्य खरेदी कार्यात मदत
८. संघीय रचना
९. सभासदांच्या क्रयशक्तीत वाढ
१०. बाजारपेठांविषयी माहिती व अन्य सुविधा
११. मध्यस्थांचे उच्चाटन

**कार्ये:**

१) शेतमालाचे एकत्रीकरण व प्रतवारी करणे
२) साठवणुकीच्या सोयी
३) मालाची बांधणी करणे
४) मालाची वाहतूक करणे
५) शेतमालाची विक्री करणे
६) शेतमालाच्या तारणावर उचल देणे
७) सरकारच्या वतीने शेतमालाची खरेदी
८) सभासदांना आवश्यक माहिती पुरविणे
९) किंमतीवर नियंत्रण ठेवणे
१०) शेतमालाची निर्यात करणे

**सहकारी खरेदी विक्री संस्थाची संघटन रचना / संघीय रचना :**

१) प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था

२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ

३) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ

४) राष्ट्रीय सहकारी खरेदी-विक्री संघ(नाफेड)

## ८.७ महत्त्वाच्या संज्ञा

**१) राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ (नाफेड) – (National Agricultural Co-operative Marketing Federation)**

राष्ट्रीय पातळीवर सहकार तत्वावर खरेदी-विक्रीचे कार्य करणारी संघीय संस्था.

## ८.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) शेतमालाची प्रतवारी व प्रमाणीकरण हे ----- सहकारी संस्थेचे कार्य असते.
अ) विपणन ब) ग्राहक क) पतपुरवठा

२) भारतातील पहिली सहकारी विपणन संस्था ----- येथे स्थापन झाली.
अ) गदग ब) हुबळी क) चेन्नई

३) शेतकऱ्यांना आपला शेतमाल ----- अभावामुळे मिळेल त्या किंमतीला विकावा लागतो.
अ) साठवणूक ब) मध्यस्थ क) अभिकर्ते

४) सहकारी खरेदी विक्री संस्थांचा मुख्य उद्देश ----- तत्वावर शेतमालाची खरेदी-विक्री करणे हा होय.
अ) व्यापारी ब) धार्मिक क) सहकारी

५) विपणन सहकारी संस्था शेतमालाच्या खरेदी-विक्री कार्याबरोबर ----- क्रिया पार पाडते.
अ) आर्थिक ब) विपणन क) उत्पादन

६) विपणन सहकारी संस्था सभासद शेतकऱ्यांना शेतीमालाच्या तारणावर ठरावीक रक्कम ----- म्हणून देतात.
अ) उचल ब) व्याज क) देणगी

७) सहकारी विपणन संस्थामुळे शेतकऱ्यांची ----- पासून मुक्तता होते.
अ) सरकार ब) ग्राहक क) मध्यस्थ

८) शेतमालाच्या बाजारातील किंमती ----- ठेवण्यासाठी विपणन सहकारी संस्था कार्यरत असतात.
अ) स्थिर ब) अस्थिर क) अत्यल्प

**ब) जोडया लावा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| अ) नाफेडची स्थापना | १) सभासदांना आगाऊ रक्कम |
| ब) विपणन सहकारी संस्था | २) गाव पातळीवर कार्य |
| क) प्राथमिक सहकारी विपणन संस्था | ३) शेतमाल खरेदी-विक्री |
| ड) शेतीमालाचे तारण | ४) १९५१ |
| इ) नाफेडचे मुख्य कार्यालय | ५) मुंबई |
| | ६) ग्राहकांना महाग माल |
| | ७) जिल्हा पातळीवर कार्य |
| | ८) औद्योगिक मालाचे उत्पादन व विक्री |
| | ९) १९५८ |
| | १०) दिल्ली |

**क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.**

१) राष्ट्रीय स्तरावर सहकारी तत्त्वावर खरेदी-विक्रीचे कार्य करणारी संघ संस्था

२) शेतकऱ्यांच्या शेतीमालास रास्त भाव मिळवून देणारी सहकारी संस्था

३) विपणन सहकारी संस्थांच्या कार्यामुळे बाजारातून उच्चाटन झालेला घटक.

४) शेतीमालाच्या खरेदी विक्रीसह एकत्रीकरण, प्रतवारी, प्रमाणीकरण, बांधणी, साठवणूक, वाहतूक इ. सेवा पुरविणारी संस्था.

५) शेती पतपुरवठा व मालविक्री यांची सांगड घालण्याचे कार्य करणारी संस्था.

**ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) पतपुरवठयाची विक्रीशी सांगड घातल्यास कर्जवसुलीला मदत होत नाही.

२) विपणन सहकारी संस्था शेतमालाच्या बाजारातील किंमती स्थिर ठेवतात.

३) सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढवितात.

४) सहकारी विपणन संस्थांपेक्षा दलालांकडून शेतमालास योग्य किंमत मिळते.

५) विपणन सहकारी संस्था केवळ शेतीमालाच्या खरेदी विक्रीचे कार्य सरकारी तत्त्वावर करतात.

६) विपणन सहकारी संस्था शेतकऱ्यांना शेतीमालाच्या तारणावर अर्थसहाय्य करतात.

७) सहकारी विपणन संस्थेमुळे शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) सहकारी विपणन संस्थेमुळे ...........चे उच्चाटन होते.

२) सहकारी खरेदी-विक्री संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत शेतमालाच्या तारणावर .......... देतात.

३) नाफेडचे मुख्य कार्यालय ............ येथे आहे.

४) शेतमालाची प्रतवारी व प्रमाणीकरण हे ........... सहकारी संस्थेचे कार्य असते.

५) शेतमालाच्या बाजारातील किंमती ........... ठेवण्यासाठी सहकारी विपणन संस्था कार्यरत असतात.

६) सहकारी विपणन संस्था .............. ची सौदाशक्ती वाढवितात.

७) सहकारी खरेदी विक्री संस्थांचा मुख्य उद्देश ........... तत्वावर शेतमालाची खरेदी-विक्री करणे होय.

८) भारतातील पहिली सहकारी विपणन संस्था ................ साली स्थापन झाली.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) जिल्हा विपणन संघ | |
| २) | राज्य स्तर |
| ३) पतपुरवठा व विक्रीत सांगड | |
| ४) तेलबियांपासून तेल | |
| ५) | शेतमालाचे तारण |
| ६) नाफेडचे मुख्य कार्यालय | |

राज्य विपणन संघ, जिल्हा स्तर, विपणन सहकारी संस्था, शेतमालावर प्रक्रिया, दिल्ली, नाफेड, उचल, इंग्लंड

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विपणन म्हणजे काय ?

२) विपणन सहकारी संस्था शेतकऱ्यांना कशाचा तारणावर अर्थसहाय्य करतात ?

३) विपणन सहकारी संस्था शेतमालाच्या खरेदी विक्री कार्याबरोबरच कोणती कार्ये पार पाडते ?

४) शेतकऱ्यांना आपला शेतमाल कशाच्या अभावामुळे मिळेल त्या किंमतीला विकावा लागतो ?

५) नाफेड म्हणजे काय ?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) विपणन सहकारी संस्थांमुळे शेतकऱ्यांची ग्राहकांपासून मुक्तता होते.

२) सहकारी विपणन संस्था मध्यस्थांची सौदाशक्ती वाढवितात.

३) भारतात पहिली विपणन संस्था मद्रास प्रांतात स्थापन झाली.

४) विपणन सहकारी संस्थांचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालतो.

५) शेतमालाच्या बाजारातील किंमती अस्थिर ठेवण्यासाठी विपणन सहकारी संस्था कार्य करतात.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) शेतमालाचे एकत्रीकरण ब) घरबांधणी
क) शेतमालाची बांधणी ड) शेतमालाची वाहतूक

२) अ) नाफेड ब) भागीदारी संस्था
क) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ

**ज) योग्य क्रम लावा.**

अ) बांधणी ब) शेतमाल विक्री
क) प्रतवारी ड) एकत्रीकरण

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) नाफेड
२) विपणन सहकारी संस्था
३) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ
४) जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ
५) प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) दलाल व मध्यस्थांकडून शेतकऱ्यांचे शोषण होते याबाबत आपले मत व्यक्त करा.
२) सहकारी विपणन संस्थांची उपयुक्तता याबाबत आपले मत व्यक्त करा.
३) ''विपणन सहकारी संस्थेच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे'' यावर आपले मत व्यक्त करा.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) प्रक्रिया सहकारी संस्था आणि सहकारी विपणन संस्था
२) पतपुरवठा सहकारी संस्था आणि सहकारी विपणन संस्था
३) सेवा सहकारी संस्था आणि सहकारी विपणन संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) सहकारी विपणन संस्थेची वैशिष्टये.
२) नाफेड (राष्ट्रीय शेती सहकारी खरेदी-विक्री संघ )
३) विपणन सहकारी संस्था.
४) सहकारी विपणन संस्थेची कार्ये.

### प्र.६ कारणे लिहा.

१) विपणन सहकारी संस्था या शेती विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.

२) सहकारी विपणन संस्थेमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते.

३) सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने गरजेची आहे.

४) शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे या उद्‌देशाने सहकारी विपणन संस्था कार्य करतात.

५) सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढवितात.

६) खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारे आर्थिक शोषण सहकारी विपणन संस्थामुळे टाळले जाते.

### प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) विपणन सहकारी संस्थेची कार्ये लिहा.

२) विपणन सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

३) सहकारी विपणन संस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

### प्र.८ दिर्घोत्तरी प्रश्न

१) सहकारी विपणन संस्था म्हणजे काय? या संस्थेची वैशिष्टये स्पष्ट करा.

२) सहकारी विपणन संस्थेची व्याख्या लिहून विविध कार्ये सविस्तर स्पष्ट करा.

◆◆◆